# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार


## (जिल्हा न्यायालय आवार, टोकर तलाव रोड, नंदुरबार)

दुरध्वनी व फॅक्स क्र. २५६४/२१०७१०, ई.मेल — dlsa.nandurbar@rediffmail.com


**जाहिरात दिनांक: १७/०२/२०२५**

अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख: **०१/०३/२०२५** संध्याकाळी ०५.३० वाजेपर्यंत

## कंत्राटी लेखापाल (Accountant)

नंदुरबार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण करीता खालील पद निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने करीता भरावयाचे आहे.

### पदाचे नाव व पात्रता

| अ. क्र | पदाचे नाव | संख्या | शैक्षणिक पात्रता (कमीत कमी) | एकत्रीत (मानधन सर्व भत्ते मिळून दरमहा) |
|---|---|---|---|---|
| १. | **लेखापाल** (Accountant) | ०१ | १. उमेदवार कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठातून किमान वाणिज्य शाखेत पदवीधर पाहिजे.<br>२. संगणकाचे ज्ञान — टॅली, एम.एस.सी.आय.टी. तसेच संबंधीत अकाउन्ट सॉफ्टवेअरची माहिती असणे आवश्यक आहे. त्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे.<br>३. टंकलेखन गती — उमेदवाराचा टंकलेखनाचा वेग ३० श.प्र.मी. पेक्षा कमी नसावा (मराठी व इंग्रजी) | रु. २५,०००/— |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ४. मराठी, इंग्रजी, हिंदी भाषा वाचता, लिहीता व बोलता आली पाहिजे.<br>५. कामाचा अनुभव: कोणत्याही संस्थेत लेखापाल म्हणून तीन वर्षाचा कामाचा अनुभव असणे आवश्यक. | |

## अटी व शर्ती

१. उमेदवार, सर्वसाधारण प्रवर्गाकरिता २१ वर्षापेक्षा कमी वयाचा आणि ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा आणि अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाव्दारे २८/०३/२०१८ रोजी त्यावेळेपुरत्या विनिर्दिष्ट केलेल्या मागास प्रवर्गाकरीता ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा. शासन निर्णय क्र.एस. आर.व्ही — १०७७/३५७६/१८३३/१६:अ, दिनांक २३/०५/१९७८ नुसार शारिरिकदृष्टया दिव्यांग व्यक्ती, जर ती अन्यथा योग्य व सदर पदांची कर्तव्य पार पाडण्याकरीता सक्षम असतील तर, त्यांच्या बाबतीत सेवा प्रवेशासाठी विहित केलेली उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल केलेली आहे.

२. या सोबत अर्जाचा नमूना दिलेला असून त्या पध्दतीचा अर्ज, हमीपत्र, लहान कुटुंबाचे नमुना—अ प्रमाणे स्वयंघोषणापत्र, प्रतिज्ञापत्र, अर्जदाराने दिनांक ०१/०३/२०२५ संध्याकाळी ०५.३० वाजेपर्यंत प्रत्यक्ष अथवा नोंदणीकृत डाकेने / स्पीड पोस्टाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार या कार्यालयाचे पुढील पत्यावर पोहचतील अशाप्रकारे दाखल करावा. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

अर्ज दाखल/ सादर/पाठविण्याचा पत्ता:—

सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
जिल्हा न्यायालय परिसर, टोकरतलाव रोड,
नंदुरबार — ४२५४१२.

३. अर्जावर/ पोष्टाच्या लिफाफयावर लेखापाल या पदाकरीता अर्ज केला आहे ते स्पष्टपणे नमूद करावे.

४. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेबाबत, संगणकाच्या ज्ञानाबाबत, टंकलेखन बाबत, अनुभवाबाबत आवश्यक प्रमाणपत्रे व दस्ताऐवजांच्या स्वयंसाक्षांकित प्रती दाखल करावेत.

५. निवड करण्यात आलेल्या उमेदवाराने प्राधिकरणाकडे करारनामा लिहून दयावयाचा आहे.

६. नेमणूकीनंतर उमेदवारास कोणतेही कारण न देता व कोणतेही पूर्व सूचना न देता नोकरीतून कमी करण्याचा अधिकार प्राधिकरणास राहील.

७. उमेदवारास नेमणूकीच्या कालावधीपूर्वी नोकरी सोडावयाची असल्यास दोन महिन्याचे आगाऊ सूचना किंवा एक महिन्याचा ढोबळ /स्थूल मानधन या प्राधिकरणाकडे जमा करावा लागेल.

८. एकत्रित मानधन हे मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांनी ठरवून दिल्याप्रमाणे असेल.

९. भरती प्रक्रियेच्या माहिती करीता अर्जदाराने जिल्हा न्यायालय, नंदुरबार यांच्या अधिकृत संकेतस्थळ https://nandurbar.dcourts.gov.in यास भेट दयावी. पात्र उमेदवारांची यादी दिनांक ०५/०३/२०२५ रोजी जिल्हा न्यायालय, नंदुरबार यांचे अधिकृत संकेतस्थळ https://nandurbar.dcourts.gov.in यावर प्रसिध्द करण्यात येईल.

१०. पात्र उमेदवारांची ५० गुणांची तोंडी मुलाखत दिनांक ११/०३/२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजता जिल्हा न्यायालय,नंदुरबार येथे घेण्यात येईल. पात्र उमेदवारांनी मुलाखतीपूर्वी एक तास अगोदर मुळ कागदपत्रासह जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय परिसर, टोकरतलाव रोड, नंदुरबार – ४२५४१२ येथे उपस्थित रहावे.

११. भरती प्रक्रियेबाबत कुठलीही माहिती उमेदवारांना https://nandurbar.dcourts.gov.in या संकेतस्थळावरून कळविण्यात येईल, त्यासाठी उमेदवारांनी वेळोवेळी सदर संकेतस्थळावर भेट द्यावी.

Secretary,
District Legal Services Authority
Nandurbar

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार
## अंतर्गत

नुकतेच काढलेले
पासपोर्ट साईज
फोटो

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार करीता निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने या कालावधीकरीता लेखापाल कंत्राटी आधारावर लेखापाल (Accountant) या पदासाठी अर्ज करण्याचा नमुना.

१. अर्जदाराचे संपुर्ण नावं व पत्ता:— ......................................................

२. जन्म तारीख:— ......./ ...../ .........

३. मोबाईल क्रमांक व ई—मेल आयडी:— .......................................
.......................................

४. शैक्षणिक अर्हता:—

| अ. क्र | शैक्षणिक अर्हता | विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

५. अनुभव — ................................................................................

६. सोबत कागदपत्रांचा स्वयंसाक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

Secretary,
District Legal Services Authority
Nandurbar

# <u>नमुना "अ"</u>

मी श्री/श्रीमती ——————————————————————————

राहणार——————————————————————————यावद्वारे पुढीलप्रमाणे जाहीर करतो / करते की,

१. मी कंत्राटी लेखापाल या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे

२. आज रोजी मला ———————(संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ——— आहे (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

स्थळ :—

दिनांक:—      /      /

उमेदवाराची स्वाक्षरी

Secretary,
District Legal Services Authority
Nandurbar

# अर्जदाराचे हमीपत्र

मी, याव्दारे, घोषिती करतो/करते की, मी अर्जात दिलेली वरील सर्व माहिती बरोबर आहे आणि जर काही चुकीचे आढळले तर माझी उमेदवारी रदद होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :—

दिनांक:—

उमेदवाराची स्वाक्षरी

Secretary,
District Legal Services Authority
Nandurbar

<u>प्रतिज्ञापत्र</u>

मी अर्जदार ------------------------- याव्दारे प्रतिज्ञापुर्वक जाहीर करतो/ करते की/ सांगतो/ सांगते की, मला कधीही अटक झालेली नाही तसेच माझे विरूध्द कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही किंवा / तसेच मला कोणत्याही फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा ठोठावलेली नाही किंवा माझे विरूध्द कुठलाही गुन्हा दाखल नाही.

स्थळ :—

दिनांक:— / /

अर्जदारचे नाव व सही

Secretary,
District Legal Services Authority
Nandurbar